विरोधकांना एकीची साद

राहुल गांधी यांच्या 'नाश्ता बैठकी'त १५ पक्षांच्या नेत्यांचा सहभाग

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांच्यानंतर, काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनीही विरोधकाच्या एकजुटीची हाक दिली. दिल्लीच्या कन्स्टिट्यूशन क्लबमध्ये मंगळवारी झालेल्या 'नाश्ता बैठकी'त १५ विरोधी पक्षांचे नेते सहभागी झाले होते. पेगॅसस, शेती कायदे, इंधन दरवाढ अशा लोकांशी संबंधित मुद्द्यांवर केंद्र सरकारविरोधात विरोधकांनी एकत्र आले पाहिजे, असे आवाहन राहुल गांधी यांनी केले.

विरोधकांनी एकत्र यावे या एकमेव उद्देशाने तुम्हाला (विरोधी पक्षांच्या नेत्यांना) आमंत्रण दिले आहे. आपण जेवढी एकी दाखवू तेवढी आपली ताकद वाढले मग, भाजप आणि संघाला आपला आवाज दाबून टाकता येणार नाही, असे राहुल गांधी यांनी विरोधी पक्षनेत्यांना उद्देशून केलेल्या भाषणात सांगितले. इंधन दरवाढीच्या मुद्द्यावर केंद्राचे आणि लोकांचे लक्ष वेधण्यासाठी आपण सायकलवरून संसदेत जाऊ, त्याचा प्रभाव पडेल, असे राहुल यांनी सुचवले. बैठकीनंतर राहुल गांधी आणि काँग्रेसचे नेते सायकलवरून संसदेत गेले.

काँग्रेससह राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, डावे पक्षांचे नेते सहभागी बैठकीत झालेले होते. मात्र बहुजन समाज पक्ष, आम आदमी पक्ष, एमआयएम या पक्षांनी बैठकीकडे पाठ फिरवली. तृणमूल काँग्रेसचे सौगत राय, महुआ मोइत्रा, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे, शिवसेनेचे खासदार संजय राऊत, द्रमुकच्या कणिमोळी, काँग्रेसचे ज्येष्ठ नेत मल्लिकार्जुन खरगे, अधीररंजन चौधरी, शशी थरूर तसेच काँग्रेसचे खासदार उपस्थित होते. या बैठकीला ६० टक्के विरोधी पक्षांचे नेते आलेले होते. विरोधकांच्या एकजुटीची ही नवी सुरुवात असून २०२४ मधील राजकारणाचे नवे चित्र असल्याचे काँग्रेसचे प्रवक्ता अभिजित मनु सिंघवी म्हणाले.



विरोधकांकडून संविधानाचा, संसदेचा अपमान- मोदी

संसदेच्या सभागृहांमध्ये विरोधकांनी कार्यक्रमपत्रिकांची फाडाफाडी केली गेली. मंत्र्यांच्या हातून कागद हिसकावून घेतले गेले. सातत्याने कामकाज बंद पाडले गेले. विरोधकांची ही कृत्ये संविधानाचा आणि संसदेचा अपमान असल्याची टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी भाजपच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत केली. पाच-सात मिनिटांमध्ये केंद्र सरकार विधेयक संमत करत असल्याबद्दल तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार डेरेक ओब्रायन यांनी ही विधेयकाला मंजुरी होती की, पापडी चाट बनवले जात होते, अशी खोचक टीका केली. त्याबद्दलही मोदींनी नाराजी व्यक्त केली. आम्हाला सर्व विधेयकांवर चर्चा करायची आहे, घाईगडबडीत विधेयके मंजूर करण्याची सरकारचीही इच्छा नाही. तृणमूल काँग्रेसच्या सदस्याने केलेली टिप्पणी संसदेचा अपमान असून त्यांनी देशाची माफी मागितली पाहिजे, असे संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले.

अखेरचे तीन दिवस?

'पेगॅसस'च्या मुद्द्यावरून झालेली संसदेतील कोंडी फुटण्याची शक्यता संपुष्टात आल्यामुळे या आठवड्याच्या अखेरीस संसदेचे पावसाळी अधिवेशन गुंडाळले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पेगॅसस असो वा अन्य कोणताही विषय संसदेचे कामकाज सुरू राहायचे असेल तर दोन्ही बाजूने तडजोड होणे आवश्यक असते, पण तशी शक्यता नसल्याने संसदेचे अधिवेशन मुदतपूर्व संपू शकेल, असे सत्ताधारी पक्षाच्या नेत्याने सांगितले. ७ ऑगस्ट रोजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी मंत्र्यांच्या भोजनांचा कार्यक्रम आयोजित केला असल्यामुळे पावसाळी अधिवेशन आणखी चार दिवस सुरू राहू शकेल. संसदेच्या अधिवेशनाचा हा तिसरा आठवडा असून मंगळवारीही दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांचा गोंधळ कायम राहिला. या गदारोळात लोकसभेत कोणत्याही चर्चेविना अत्यावश्यक संरक्षण सेवा विधेयक मंजूर करण्यात आले. राज्यसभेत दिवाळखोरीसंदर्भातील दुरुस्ती विधेयक मंजूर झाले. लोकसभेत गेल्या आठवड्यात ते मंजूर करण्यात आले होते.



सहकाराच्या मुद्द्यावर पवार-शहा भेट

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली: राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मंगळवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची संसद भवनातील कार्यालयात भेट घेतली. शहा यांनी केंद्रीय सहकार मंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर पवारांनी घेतलेली ही पहिलीच भेट असून सहकारी साखर कारखान्यांच्या समस्यांवर चर्चा झाल्याचे ट्वीट पवार यांनी बैठकीनंतर केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर व व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे हेही सोबत होते. उसाचा हमीभाव, साखरेचे दर आणि अतिरिक्त उत्पादन, इथेनॉल उत्पादन आदी मुद्द्यांकडे शहा यांचे लक्ष वेधण्यात आले. ''एनडीआरएफ'' चा बेस कॅम्प महाडमध्ये व्हावा अशी मागणी तटकरे यांनी केली.

दोन आठवड्यांपूर्वी शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन नागरी सहकारी बँकांच्या प्रश्नांवर चर्चा केली होती. काही दिवसांपूर्वी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी पवार यांची निवासस्थानी जाऊन भेट घेतली होती. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या काळात पवारांच्या गाठीभेटींकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले गेले आहे.

भारतीय- अमेरिकी विद्यार्थिनी जगात सर्वात हुशार !

वॉशिंग्टन : अमेरिकेतील विद्यापीठाच्या सॅट व ॲक्ट या प्रमाणित चाचण्यांमध्ये भारतीय - अमेरिकी वंशाची नताशा पेरी चमकली असून ती जगातील सर्वाधिक बुद्धिमान विद्यार्थ्यांपैकी एक ठरली. ती अकरा वर्षांची आहे.

स्कोलेस्टिक असेसमेंट टेस्ट आणि अमेरिकन कॉलेज टेस्टिंग म्हणजे सॅट आणि ॲक्ट या महाविद्यालयीन प्रवेशासाठीच्या परीक्षा आहेत. काही कंपन्याही या गुणांवरून विद्यार्थ्यांना काम देऊ शकतात. स्वयंसेवी संस्थाही त्यांच्या हुशारीचा उपयोग करून घेऊ शकतात. महाविद्यालयात प्रवेशासाठी सॅट किंवा ॲक्ट या परीक्षा द्याव्या लागतात. त्यातील गुण हे विद्यापीठातील प्रवेशासाठीही ग्राह्य धरले जातात. पेरी ही न्यूजर्सीतील थेलमा एल, स्टँडमियर एलेमेंटरी स्कूलची विद्यार्थिनी असून तिने सॅट, ॲक्ट व हॉपकिन्स विद्यापीठाच्या सीटीवाय परीक्षेत प्रावीण्य मिळवले आहे. ८४ देशांतील १९ हजार विद्यार्थ्यांनी सीटीवाय परीक्षा दिली होती. २०२१ मध्ये पेरी हिने जॉन हॉपकिन्स टॅलेंट सर्च चाचणी दिली होती. त्यावेळी ती पाचवीत होती. तिने जेआरआर टोलकिन यांच्या कादंबऱ्याही वाचल्या आहेत.



त्रिपुरातील चकमकीत 'बीएसएफ'चे दोघे शहीद

आगरतळा : त्रिपुरातील भारत-बांगलादेश आंतरराष्ट्रीय सीमेवर मंगळवारी सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) गस्ती पथकावर 'एनएलएफटी'च्या दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात एक उपनिरीक्षक आणि जवान शहीद झाले.

नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा (एनएलएफटी) ही बंदी घालण्यात आलेली संघटना आहे. त्रिपुराच्या धलाई जिल्ह्यात सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास जवान आणि दहशतवाद्यांत चकमक उडाली. दहशतवाद्यांनी हल्ला चढवताच जवानांनी त्याला चोख प्रत्युत्तर दिले. आर. सी. नाथ सीमा चौकीजवळ हा संघर्ष झाला. हा भाग पानीसागर क्षेत्राच्या चावमनू पोलीस ठाण्याच्या हद्दीत येतो. त्रिपुराची राजधानी आगरतळापासून धलाई ९४ किलोमीटरवर आहे. चकमकीदरम्यान उपनिरीक्षक भारूसिंग आणि जवान राजकुमार हे गंभीर जखमी झाले. त्यांचा मृत्यू ओढवला. घटनास्थळी आढळेल्या रक्ताच्या डागांवरून चकमकीत दहशतवादीही जखमी झाले असावेत असे दिसते, अशी माहिती सीमा सुरक्षा दलाच्या प्रवक्त्याने दिली.

भारताला हार्पून क्षेपणास्त्र संच विक्रीस अमेरिकेची मंजुरी

वृत्तसंस्था, वॉशिंग्टन

भारताला 'हार्पून जॉइंट कॉमन टेस्ट सेट'म्हणजे जेसीटीएस यंत्रणा विकण्यास अमेरिकेने मंजुरी दिली आहे. या संचाची किंमत ८.२ कोटी डॉलर्स असून त्यामुळे दोन्ही देशातील द्विपक्षीय सामरिक संबंध सुधारणार असून हिंद प्रशांत क्षेत्रात भारत हा प्रमुख संरक्षण भागीदार ठरणार आहे.

पेंटॅगॉनच्या संरक्षण सुरक्षा सहकार्य संस्थेने हा संच भारताला देण्यास हिरवा कंदील दिल्यानंतर आता त्याबाबतची अधिसूचना अमेरिकी काँग्रेसमध्ये मंजूर केली जाणार आहे. हार्पून ही जहाज विरोधी क्षेपणास्त्र संच मालिका आहे. भारत सरकारने 'हार्पून जॉइंट कॉमन टेस्ट सेट'ची मागणी अमेरिकेकडे केली होती. त्यात हार्पून क्षेपणास्त्रच्या सुट्या भागांची निगा व दुरुस्ती यासाठी एक केंद्र उभारले जाणार आहे. यात तांत्रिक माहिती व प्रशिक्षण या बाबींचाही समावेश आहे. प्रस्तावित क्षेपणास्त्र संच विक्रीने अमेरिका व भारत यांच्यातील परराष्ट्र धोरण योजना व राष्ट्रीय सुरक्षा यांना बळ मिळणार आहे. राजकीय स्थिरता, शांतता व आर्थिक प्रगती यांना यातून प्राधान्य मिळेल असे डीएसएसीए या पेंटॅगॉनच्या संस्थेने म्हटले आहे.

पंतप्रधान मोदी यांनी जून २०१६ मध्ये अमेरिकेला भेट दिली होती त्यावेळी अमेरिकेने भारताला महत्त्वाचा संरक्षण भागीदार म्हणून मान्यता दिली होती. त्यात संरक्षण तंत्रज्ञानाचाही समावेश होता. सदर हार्पून संचाच्या विक्रीने भारताची संरक्षण क्षमता अधिक वाढणार असून त्यात हार्पून क्षेपणास्त्रांची देखभाल करणे सोपे जाणार आहे. यातून मूळ प्रादेशिक लष्करी समतोल ढळणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे असे पेंटॅगॉनने म्हटले आहे.



'परस्पर हिताचे अनेक घटक'

वॉशिंग्टन : भारत व अमेरिका यांच्यात व्यापार व आर्थिक यासह अनेक परस्पर हिताचे मुद्दे असून अनेक मूल्येही समान आहेत. अलीकडच्या भारत भेटीत आपण प्रादेशिक सुरक्षा व हवामान बदल यासह अनेक क्षेत्रातील सहकार्याबाबत चर्चा केली, असे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री टोनी ब्लिंकन यांनी म्हटले आहे. ब्लिंकन हे २७ जुलैला भारताच्या दौऱ्यावर होते.

SBI

ग्लोबल मार्केट डिपार्टमेंट, १४ वा मजला, स्टेट बँक भवन, कॉरपोरेट सेंटर, मुंबई

शुध्दीपत्रक

फॅसिलिटी मॅनेजमेन्ट सर्व्हिसेसच्या (एफएमएसच्या) आणि पीसीज, सर्व्हर्स व पेरिफेरल्स ह्यांच्या एएमसीच्या संपादनासाठी प्रस्तावाची विनंती

दिनांक १६.०७.२०२१ रोजीचा आरएफपी क्र. एसबीआय: जीएम: CONTROL/०२/२०२१ पहा. दिनांक ०३.०८.२०२१ रोजीचे शुद्धीपत्रक बँकेची वेबसाईट **https://bank.sbi** किंवा **https://www.sbi.co.in** वर प्रोक्युअरमेंट न्यूज अंतर्गत उपलब्ध आहे. बोली दाखल करण्याची शेवटची तारीख आणि वेळ ०७.०८.२०२१ संध्याकाळी ५.०० वाजता ऐवजी १३.०८.२०२१ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता अशी करण्यात आलेली आहे.

स्थान : मुंबई
दिनांक : ०४.०८.२०२१ उप महाव्यवस्थापक (ऑपरेशन)

म्हसळा नगर पंचायत म्हसळा

जाहीर ई-निविदा सूचना २०२१-२२

mhaslanagarpanchayat@gmail.com ०२१४९-२३२२४५

म्हसळा नगर पंचायत कंपनी/ ठेकेदार/ संस्था यांच्याकडून खालील कामांकरिता ऑनलाइन पद्धतीने निविदा मागवीत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	निविदा फॉर्म फी (रुपये)	इसारा रक्कम	कामाची मुदत
१	म्हसळा नगर पंचायत हद्दीमध्ये हिंदू स्मशानभूमी येथे एल.पी.जी. गॅस शवदाहिनी बसविणे व अग्निदाह हॉलचे बांधकाम करणे.	५,०००/-	९१,७१०/-	६ महिने

ई-निविदा सूचना व प्रपत्रे **दि. ०४.०८.२०२१ सकाळी १०.०० ते दि. २८.०८.२०२१ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत** अधिकृत संकेतस्थळ **https://mahatenders.gov.in** वर उपलब्ध आहेत. निविदा **२८.०८.२०२१ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत** स्वीकारण्यात येतील व शक्य झाल्यास **दि. ३०.०८.२०२१ रोजी सायं. ०५.०० वा.** आलेल्या निविदा ऑनलाइन पद्धतीने उघडण्यात येतील.

जा.क्र. ९७४ म्हनप/२०२१-२२ — सही/- मुख्याधिकारी म्हसळा नगर पंचायत
म्हसळा नगर पंचायत कार्यालय, म्हसळा जिल्हा- रायगड. **दिनांक :** ०३.०८.२०२१ — सही/- प्रशासक म्हसळा नगर पंचायत

दक्षिण मध्य रेल्वे

आमला फॉलो करा @SCRailwayindia
द. म. रेल्वेच्या निविदा सूचनांचा तपशील आमची वेबसाइट : www.scr.indianrailways.gov.in येथे पाहता येईल

ई-प्राणांचा निविदा सूचना

प्रीस्ट्रेस्ड काँक्रिट स्लिपरच्या उत्पादकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी रेल्वेची वेबसाइट **www.ireps.gov.in** येथे भेट द्यावी. तेथे दक्षिण मध्य रेल्वेच्या पीएससी सेक्शन, इंजिनिअरिंग हेडक्वार्टर्स (पीसीई / ओ/ एससी) पीएससी टर्नआऊट स्लिपरच्या निविदा प्रसिद्ध केल्या आहेत आणि निविदांची कागदपत्रे उपलब्ध आहेत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे देकार ऑनलाइन आणि आयआरईपीएस वेबसाइटद्वारे सादर करावेत. निविदांचा संपूर्ण तपशील आयआरईपीएस यांच्या वेबसाइटवर पाहता येईल.

चीफ इंजिनिअर / टीपी
ए०८३८ सिकंदराबाद

निविदांच्या अटी/ तपशील यासाठी आणि निविदा कागदपत्रे डाऊनलोड करण्यासाठी कृपया **https://www.ireps.gov.in** किंवा **www.scr.indianrailways.gov.in** या वेबसाइट्सना भेट द्यावी.

मुंबई पोर्ट ट्रस्ट

सूचना

असे कळविण्यात येते की, स्टेट लेव्हल एन्व्हॉयरन्मेंट इम्पॅक्ट ॲसेसमेंट ॲथोरिटीने तिच्या दिनांकित ३१.०३.२०२० पत्र क्र. एसएआय/एमएच/एमआयएस/१३३५६७/२०१९ मार्फत ''**मुंबई पोर्ट ट्रस्टद्वारा बलार्ड पिअर एक्स्टेंशन, इंदिरा डॉक, मुंबई येथील मुंबई पोर्ट ट्रस्टच्या विद्यमान क्रुझ टर्मिनल बिल्डिंग (जी+१) च्या पुनर्बांधकामाकरिता प्रस्तावित मर्यादित दुरुस्ती**'' या प्रकल्पाकरिता पर्यावरण मंजुरी दिली आहे आणि मंजुरी पत्राच्या प्रती महाराष्ट्र पर्यावरण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहेत आणि **http://parivesh.nic.in** या वेबसाइटवरसुद्धा पाहता येतील.

एमबीपीटी-१०-२०२१ मुख्य अभियंता

दादरा नगर हवेली और दमन और दीव प्रशासन

शिक्षा निदेशक, समग्र शिक्षा दमन

समग्र शिक्षा के तहत ०१ आचार्य, ०२ वरिष्ठ लेक्चरर और ०३ लेक्चरर के पद के लिए आवेदन आमंत्रित किए गए हैं। अधिक जानकारी **www.daman.nic.in** पर देखी जा सकती है।

स्वाक्षरी/-
नीलेश गुरव
राज्य परियोजना निदेशक
समग्र शिक्षा

No. IP/DMN/215/2021-22/138
Dtd. 02.08.2021

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

महिला व बालकल्याण विभाग

मुदतवाढ

जाहीर आवाहन जा.क्र. कडोंमपा/मबाकवि/मुका/३२
दिनांक : ०२.०८.२०२१

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महापालिका क्षेत्रातील खालील पात्रता धारण करीत असलेल्या मुली व महिलांना लाभार्थ्यांना **कायदेविषयक प्रशिक्षण, सायबर लॉ, पाककला, बॅग मेकिंग, एमसीआयटी, टॅली, डी.टी.पी., नर्सिंग इ. प्रशिक्षण** देण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता लाभार्थ्यांना निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

वरील प्रशिक्षणासंबंधी अर्ज महापालिकेच्या संकेतस्थळावर **kdmc.gov.in** यावर पाहून जोडलेल्या नमुन्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रासह **दि. ३१.०८.२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वा.पर्यंत** पोस्टाद्वारे अथवा हस्तदेय बटवड्याद्वारे सादर करावेत. विहित मुदतीत प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/३६९
दि. ०३.०८.२०२१

स्वाक्षरी/-
(अनंत कदम)
उप आयुक्त (मबाकवि),
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

डाक जीवन बीमा Postal Life Insurance

मुंबई पश्चिम टपाल विभागाअंतर्गत टपाल जीवन विमाकरिता एजन्ट नियुक्तीसाठी थेट मुलाखत

पात्रता व इतर मापदंड :

१. **वयोमर्यादा :** कमीत कमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ५० वर्षे.
२. **शैक्षणिक अर्हता :** मान्यताप्राप्त केंद्रीय/ राज्य सरकारी बोर्ड/ संस्थांमधून १०वी उत्तीर्ण.
३. **अनुभव :** आवेदनकर्त्याला विमा क्षेत्राबाबत अनुभवी किंवा फ्रेशर चालेल.
४. **श्रेणी :** बेरोजगार/ स्वयंरोजगार व्यक्ती, माजी विमा सल्लागार/ अभिकर्ता, निवृत्त कर्मचारी, स्वयंसाहायता समूह पदाधिकारी, माजी सैनिक, अंगणवाडी कर्मचारी, गृहिणी, इतर स्वयंसेवक इत्यादी आवेदन करू शकता.
५. **कमिशन श्रेणी :** अभिकर्ता नियुक्ती ही फक्त आणि फक्त कमिशन आधारित राहील. इतर वाहतूक/ महागाई भत्ता दिला जाणार नाही. विमा हप्त्यावर १% पासून ते २०% पर्यंत पॉलिसी कालावधीनुसार कमिशन देय राहील.
६. **निवड प्रक्रिया :** निवड फक्त थेट मुलाखतीद्वारे करण्यात येईल. निवडलेल्या अभिकर्त्याला पोस्ट विभागातर्फे आंतरिक/ व्यावहारिक प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण पूर्ण करून अंतर्गत परीक्षा पास उमेदवारांना टपाल जीवन विमाधारकाचा परवाना देण्यात येईल.
७. **शुल्क :** निवड झालेल्या उमेदवारांना तात्पुरत्या परवानाकरिता रु.५०/- आणि परवाना परीक्षेसाठी रु.४००/- फी जमा करावी लागेल व रु.५,०००/- राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (एन.एस.सी.)/ किसान विकास पत्र (के.व्ही.पी.)च्या स्वरूपात भारताच्या राष्ट्रपतींच्या नावे तारण म्हणून ठेवावे लागेल.

थेट मुलाखत तारीख व स्थळ :

थेट मुलाखतीकरिता उमेदवारांनी कार्यालय **वरिष्ठ डाक अधीक्षक, मुंबई पश्चिम विभाग, ४था मजला, दादर पोस्ट ऑफिस बिल्डिंग येथे दिनांक १२.०८.२०२१ रोजी ११.०० ते ०४.०० या** वेळेत सोबत पात्र शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र (मूळ प्रत), पॅन कार्ड, आधार कार्ड, २ पासपोर्ट साइझ फोटोसोबत हजर राहावे.

सही/-
(पी. सी. जगताप)
वरिष्ठ अधीक्षक डाकघर,
मुंबई पश्चिम विभाग, मुंबई-४०० ०१४.

MCXCCL

मल्टि कमोडिटी एक्स्चेंज क्लीअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

नोंद. कार्यालय : एक्स्चेंज स्क्वेअर, सीटीएस २५५, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३
CIN : U74999MH2008PLC185349; ई-मेल आयडी : ig-mcxccl.com; वेबसाइट : https://www.mcxccl.com

१३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनीची तेरावी एजीएम शुक्रवार, दि. २७ ऑगस्ट, २०२१ रोजी दु. ०४.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग/ इतर दृक्श्राव्य माध्यमांच्या (''ओएव्हीएम'') योगे घेण्यात येईल आणि तीत २३ जुलै, २०२१ रोजीच्या एजीएमच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज करण्यात येईल. कॉर्पोरेट बाबी मंत्रालय आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या परिपत्रकांच्या अनुषंगाने एजीएम व्हीसी/ ओएव्हीएमच्या माध्यमातून घेण्यात येईल.

सदर परिपत्रकांनुसार सर्व सभासदांना एजीएमची सूचना आणि २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल दि. ०३ ऑगस्ट, २०२१ रोजी त्यांच्या कंपनीकडे नोंदणीकृत असलेल्या ई-मेल ॲड्रेसवर पाठविण्यात आलेला आहे. एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर *https://www.mcxccl.com* येथेसुद्धा उपलब्ध आहेत. सदर एजीएमच्या सूचनेत एजीएममध्ये सहभागी होण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

एजीएममध्ये करण्यात येणाऱ्या कामकाजाच्या बाबींशी संबंधित कागदपत्रे सभेच्या दिनांकापर्यंत पाहण्यासाठी उपलब्ध असतील.

मल्टि कमोडिटी एक्स्चेंज क्लीअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड
स्वा./-
मंदार कुलकर्णी
कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०२१

भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादित

(भारत सरकारचा उपक्रम)

शिपिंग हाउस, २४५, मदाम कामा रोड, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१, भारत
• संकेतस्थळ : www.shipindia.com • Twitter: @shippingcorp
• CIN No.: L63030MH1950GOI008033

SCI Navratna Company (ISO 9001:2015, ISO 14001:2015 & ISO 45001:2018 Certified)

७१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंदर्भात (एजीएम) माहिती

१. दिनांक २८.०५.२०२१ च्या आमच्या सूचनेच्या अनुषंगाने भागधारकांना ह्याद्वारे कळविण्यात येत आहे की एमसीएची परिपत्रके आणि सेबी परिपत्रक आणि इतर लागू कायदे व परिपत्रकांचे अनुपालन करून व्हिडियो कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/अन्य दृक्-श्राव्य माध्यमाद्वारे (ओएव्हीएम) कंपनीची ७१ वी एजीएम **गुरुवार दि. २६ ऑगस्ट, २०२१ रोजी** भारतीय वेळेनुसार **दुपारी ३.३० वाजता** आयोजित करून सूचनेत उल्लेखिल्याप्रमाणे कार्य संपन्न करण्यात येतील.
२. भागधारकांनी कंपनीच्या एजीएम संदर्भात महत्त्वाचे दिनांक व संकेतस्थळांचे मार्ग लक्षात ठेवावे.

अ.क्र.	तपशील		महत्त्वपूर्ण दिनांक/संकेतस्थळ/ई-मेल आयडी
१.	बुक क्लोजरचा दिनांक	दिनांक	१९.०८.२०२१ ते २६.०८.२०२१ (दोन्ही दिवस समाविष्ट)
२.	लाभांशाकरिता रेकॉर्डचा दिनांक	दिनांक	१८.०८.२०२१
३.	दूरस्थ ई-मतदान कालावधी	दिनांक	२३.०८.२०२१ रोजी सकाळी ९.०० पासून ते २५.०८.२०२१ रोजी सायं. ५.०० पर्यंत
४.	दूरस्थ ई-मतदानाकरिता पात्रतेसाठी कट-ऑफ दिनांक	दिनांक	१९.०८.२०२१
५.	१५ एच/१५जी/१०एफ प्रपत्र डाऊनलोड करण्याकरिता	संकेतस्थळ	**www.bigshareonline.com** येथे "For Investors → Investors Resources /15G/15H/10F"
६.	ई-मेल आयडीवर १५एच/१५जी/१०एफ प्रपत्र प्रस्तुत करणे	ई-मेल आयडी	**tds@bigshareonline.com**
७.	प्रत्यक्ष रुपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांकरिता ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक आणि बँक खाते तपशील अद्ययावत करण्याकरिता	संकेतस्थळ	**www.bigshareonline.com** येथे "For Investors → Email / Bank Detail Registration"
८.	डीमॅट रुपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांकरिता ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक, केवायसी आणि बँक खाते तपशील अद्ययावत करण्याकरिता		कृपया आपल्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटस् (डीपीज)/ डिपॉझिटरीजकडे हे तपशील अद्ययावत करावे.
९.	लाभांशावर लागू होण्यायोग्य टीडीएस/ ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक, केवायसी आणि बँक खाते तपशील अद्ययावत कसे करावे ह्याची तपशीलवार माहिती तसेच व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएम मध्ये उपस्थित राहण्याकरिता माहिती	संकेतस्थळ	**www.shipindia.com** येथे "Investors → Information for Shareholders→ Notices" विभाग
१०.	डीमॅट, प्रत्यक्ष रुपात भाग धारण करणारे भागधारक आणि ज्या भागधारकांनी आपल्या ई-मेल पत्त्यांची नोंदणी केली नाही अश्या भागधारकांसाठी दूरस्थ ई-मतदानाची पद्धत		

३. जर लाभांश मंजूर झाला तर, तो ज्या भागधारकांनी आपले बँक खाते तपशील अद्ययावत केले असेल अश्यांना एजीएम झाल्यापासून ३० दिवसात विविध ऑनलाईन हस्तांतरण माध्यमातून ऑनलाईन प्रदान करण्यात येईल. ज्या भागधारकांनी आपले बँक तपशील अद्ययावत केले नसतील, त्यांचे लाभांश वॉरंटस्/डिमांड ड्राफ्ट/चेक त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर पाठविले जातील. लाभांश वेळेवर मिळण्याकरिता भागधारक प्रत्यक्ष रुपात भाग धारण करत असतील ते आपला बँकेचा तपशील व केवायसी आरटीए कडे अद्ययावत करु शकतील आणि डीमॅट रुपात भाग धारण करणारे डिपॉझिटरी/ डीपी कडे बँकेचा तपशील व केवायसी अद्ययावत करु शकतील. कंपनीद्वारे प्रदान या वितरित केलेला लाभांश भागधारकांच्या हाती करण्योग्य असेल. टीडीएसचे दर भागधारकांच्या निवासी परिस्थितीवर वेग-वेगळे असू शकतील.
४. सदस्य आरटीए येथे **investor@bigshareonline.com** किंवा दूरध्वनी ०२२-६२६३८२०० येथे संपर्क करु शकतील.
५. ही सूचना वार्षिक अहवाल २०२०-२१ सहित फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारेच पाठववली जात आहे. ही **www.shipindia.com, www.bseindia.com, www.nseindia.com** आणि **https://www.evoting.nsdl.com** येथे उपलब्ध आहे. ही ई-सूचना दिल्यानंतर एखाद्या व्यक्तीने भाग धारण केल्यास, ती व्यक्ती वार्षिक अहवालाकरिता एससीआयचे संकेतस्थळ **www.shipindia.com** येथे 'Financials →Financial Results → Annual Reports' विभागाला भेट देऊ शकेल.
६. कंपनी आपल्या भागधारकांना एजीएमच्या सूचनेमध्ये दाखविलेल्या ठरावांकरिता इलेक्ट्रॉनिकली मतदान करण्याकरिता एनएसडीएलद्वारे पुरविलेल्या सेवांच्या माध्यमातून दूरस्थ ई-मतदानाची सेवा पुरवत आहे. ज्या सदस्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले नाही व तसे करण्यास जे अपात्र नाहीत आणि जे व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएममध्ये उपस्थित असतील, ते एजीएम दरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. दूरस्थ ई-मतदान तसेच एजीएम दरम्यान ई-मतदानाच्या पद्धतीचे तपशीलवार स्पष्टीकरण वार्षिक अहवालाच्या सूचनेमध्ये दिले आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादित करिता
सही/-
श्री. दिपांकर हालदर
कार्यकारी संचालक (विधिक कार्य) आणि कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०३.०८.२०२१

कार्गोचे परिवहन. जीवनात परिवर्तन.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

किरकोळ कामासाठी ई-निविदा सूचना

(१) **निविदा सूचना क्र. : ई-आर-टी-३५-२१-२२ दिनांक २०.०७.२०२१ कामाचे नाव :** बिलासपूर दुर्ग अनुभागातील जुन्या आणि क्षतिग्रस्त ग्लूइड जॉइन्ट २९५ संच (६० किग्रॅ)चे नूतनीकरण; क्रॉसिंग सेट स्लीपर्स (१ इन १२-१२० संच)चे नूतनीकरण; टीटीआर ८० संच (टीडब्ल्यूएस + डब्ल्यूसीएमसी) (८० संच १ इन १२). निविदा मूल्य : रु. १,७५,६५,७२७/-.

(२) **निविदा सूचना क्र. : ई-आर-टी-३६-२१-२२ दिनांक २०.०७.२०२१ कामाचे नाव :** एडीईएन/ आय/ भिलाईच्या अधिकार क्षेत्रामधील विविध यार्ड्सच्या प्लेन ट्रॅक मेनच्या डीप स्क्रीनिंगसाठी उर्वरित काम. निविदा मूल्य : रु. ४७,६३,६६७